**स.के.नं.५८२/२०२४**
**नि. क्र. १० लगत**

अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.४ ची जबानी
माझे नाव – श्वेता संजय सुर्वे
वय वर्षे –४२ वर्षे, व्यवसाय – गृहिणी
राहणार – अलोरे, ता. चिपळूण, जि. रत्नागिरी.

मी सत्य प्रतिज्ञेवर असे कथन करते की,

**सरतपास अभियोग पक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्रीम.एस.आर.वनकर यांचेमार्फत सुरु.**

संजय यशवंत सुर्वे माझे पती होते. ते कृष्णा ॲन्टीऑक्सीडंट युनिट क्र.३ मध्ये कामास होते. ती कंपनी खडपोली येथे आहे. त्यांची कामाची वेळ सकाळी ०८.३० पासून संध्या. ०५.३० पर्यंत होती. माझे पती सदर कंपनीत हेल्पर म्हणून नोकरीस होते. दि.१३.०५.२०२४ रोजी मी घरी होते. कंपनीमध्ये माझे पती केमीकलमुळे भाजल्याचे मला समजले. कंपनीच्या गेट वरून मला कॉल आला. माझ्या पतीला अपरांत हॉस्पीटल मध्ये उपचारासाठी दाखल केले होते. माझ्या पतीसोबत कंपनीतील इतर कर्मचा–यांना देखील भाजले होते. परंतु, मला त्यांची नावे माहीत नाही. माझ्या पतीला पुढील उपचारासाठी नॅशनल बर्न हॉस्पीटल, एरोली, नवी मुंबई येथे नेले. माझ्या पतीला कशामुळे भाजले किंवा काय झाले याची चौकशी केली नाही. त्या कंपनीचे मॅनेजर पाटील आहेत. त्यांना पाहिल्यास मी ओळखू शकते. आज रोजी ते हजर आहेत.

सरतपास पुर्ण

**आरोपी तर्फे विधीज्ञ श्री. समीर.एस.बुटाला यांनी उलटतपास नाकारला.**

उलटतपास पुर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृती.
सही/–
(वाय.सी. पाटील )
सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, व
न्यायादंडाधिकारी वर्ग–१, चिपळूण.

दिनांक – ०८/०१/२०२६
चिपळूण.

# <u>- प्रमाणपत्र -</u>

मी हमी देतो की, सदरच्या पी. डी. एफ. फाईलमधील मजकुर हा मुळ पुराव्यामधील प्रत्येक शब्दानुसार बरोबर आहे.

| | |
|---|---|
| लघुलेखकाचे नाव | एम.इ.आरेकर, लघुलेखक श्रेणी–३ |
| **न्यायालयाचे नाव** | **सह दिवाणी न्यायालय क.स्तर, चिपळूण, ता.चिपळूण जि.रत्नागिरी.** |
| पुरावा टंकलेखीत दिनांक | ०८.०१.२०२६ |
| न्यायिक अधिकारी यांनी सही केलेले दिनांक | ०८.०१.२०२६ |
| पुरावा अपलोड केलेले दिनांक | ०९.०१.२०२६ |